REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 8 | MAY - 2019

# ''वस्तु व सेवा कराच्या (GST) अमलबजावणीचा भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम, एक अध्ययन''

डॉ. रेकचंद ग. गोंगले

सहाय्यक प्राध्यापक , एम.कॉम,एम.फील,पीएच.डी
स्नातकोत्तर वाणिज्य विभाग , नबीरा महाविद्यालय, काटोल.




## प्रस्तावना :–

आपल्या देशाचा कारभार चालवितांना सरकारला वेगवेगळे कर्तव्य पार पाडावे लागतात. कर्तव्य पार पाडतांना सरकारला मोठया प्रमाणावर खर्च करावा लागतो. उदा. अन्न, वस्त्र, निवारा, रस्ते, दळणवळण, दूरसंचार, संरक्षण व्यवस्था, टपाल व्यवस्था इत्यादी या सारख्या नागरी सुविधावर त्याचप्रमाणे कायदा व सुव्यवस्था याशिवाय उद्योग, धरणे इत्यादी विकासात्मक कार्यावर खर्च करावा लागतो. हा खर्च भागविण्यासाठी शासनाला वेगवेगळया माध्यमातुन महसुल गोळा करावा लागतो. जगातील सर्व देश आपल्या नागरिकाकडून कराच्या माध्यमातुन महसूल गोळा करतात. सरकार महसूल गोळा करण्याकरीता आपल्या नागरिकाकडुन विविध प्रकारच्या कराची आकारणी करते. या कराचे दोन प्रकार आहेत.

### १. प्रत्यक्ष कर ( Direct Taxes)

'' कर भरण्याची जबाबदारी असलेल्या व्यक्तिलाच कराचा भरणा करावा लागतो या कराची जबाबदारी दुसऱ्या व्यक्तिवर सोपविता येत नाही अशा कराला प्रत्यक्ष कर असे म्हणतात.'' उदा. आयकर

### २. अप्रत्यक्ष कर ( Indirect Taxes)

''ज्या कराचा बोजा करदात्याला स्वत:च्या खिशातून भरवा न लागता तो दुसऱ्याकडून वसूल करू शकतो, अप्रत्यक्षपणे एका व्यक्तिकडून दुसऱ्या व्यक्तिकडे स्थानांतर होऊन त्या व्यक्तिवर भार पडतो. व शेवटी कराचा भार उपभोक्त्यावर पडतो. तेव्हा त्याला 'अप्रत्यक्ष कर' असे म्हणतात''. उदा. आयकर सोडून सर्व प्रकारचे केंद्रीय व राज्यस्तरीय कर.

### वस्तु व सेवा कर (GST) :–

'वस्तु व सेवा कर' (GST) हा अप्रत्यक्ष कर असून भारतातील 'अप्रत्यक्ष कर' व्यवस्थेतील महत्वपूर्ण सुधारणा करण्यासाठी भारत सरकारने 'वस्तु व सेवा कर' (GST) ही नवीन कर प्रणाली अमलात आणण्याकरीता एक महत्वपुर्ण पाऊल उचलले आहे. केंद्र व राज्य सरकारच्या विविध करांचे एकत्रीकरण करून करदात्याचा एकंदरीत कराचा भार कमी होईल व केंद्र व राज्य सरकारच्या महसुलातही वाढ होऊन ही कर प्रणाली प्रशासकीय अमलबजावणित पारदर्शकता निर्माण होइल असा विश्वास भारत सरकारने व्यक्त केला आहे. भारतामध्ये 'वस्तु व सेवा कर'(GST) १जुलै २०१७ पासून अमलात आला. त्यामूळे पूर्वीच्या केंद्र सरकारच्या आठ प्रकारचे तर राज्य सरकारच्या दहा प्रकारच्या विविध कराचे स्थान 'वस्तु व सेवा कर'(GST) यांनी घेतले आहे. यामध्ये निर्मिती किंवा उत्पादनापासुन ते अंतिम उपभोक्त्यापर्यंत प्रत्येक टप्प्यावर कर आकारणी करण्याचे प्रस्तावीत केले आहे. मागील टप्प्यावर शोधन केलेली कराची जमा रक्कम समायोजित करता येईल. 'वस्तु व सेवा कर'(GST) एक एकत्रित कर पध्दती असून वस्तु व सेवा या दोन्हीवर कर लावला जातो. भारतामध्ये २९ राज्य असून

प्रत्येक राज्यात केंद्र सरकार व राज्य सरकार या दोन्ही सरकारांचे अधिपत्य चालते. 'वस्तु व सेवा कर' (GST) प्रणाली प्रमाणे एखादा करपात्र व्यवसायी जेव्हा वस्तु किंवा सेवांचा पुरवठा करतो तेव्हा CGST & SGST अंतर्गत कर आकारणी करतो. ज्या व्यक्तिला वस्तु व सेवांचा पुरवठा केला असेल त्यांच्या कडून कराची वसुली केली जाते. पुरवठादार म्हणजेच करपात्र व्यक्तिने वसुल केलेला कर हा सरकारच्या खात्यामध्ये जमा करणे अनिवार्य आहे. या दोन्ही सरकारच्या खर्चासाठी निधी उपलब्ध व्हावा म्हणून दोन्ही सरकार वेगवेगळे कर लावतात. 'वस्तु व सेवा कर' हा एकच कर जरी असला तरी त्यामध्ये ४ प्रकारच्या करांचा अंतर्भाव आहे.

१. केंद्रीय वस्तु व सेवा कर (CGST) Central Goods & Service Taxes.
२. राज्य वस्तु व सेवा कर (SGST) State Goods & Service Taxes.
३. एकात्मिक वस्तु व सेवा कर (IGST) Integrated Goods & Service Taxes.
४. संघ राज्य वस्तु व सेवा कर (UTGST) Union Territory Goods & Service Taxes.

## संशोधनाची उद्धिष्टये :—

१. 'वस्तु व सेवा कर' (GST) या संकल्पनेचा अभ्यास करणे.
२. 'वस्तु व सेवा कर' (GST) या कररचनेचा अभ्यास करणे.
३. 'वस्तु व सेवा कर' (GST) प्रणालीच्या भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.
४. 'वस्तु व सेवा कर' (GST) प्रणालींच्या लाभांचा अभ्यास करणे.

## अभ्यास पध्दती :—

संशोधकाने ''वस्तु व सेवा कराच्या अंमलबजावणीचा भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम, एक अध्ययन'' हा विषय अभ्यासला असुन तथ्य संकलन पध्दतीतील दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये सरकारी अहवाल, विविध वेबसाईट, पुस्तके इत्यादी अभ्यासातून माहितीचे संकलन केलेल आहे.

## वस्तु व सेवा करा(GST) पूर्वी अप्रत्यक्ष कर प्रणाली आणि वस्तु व सेवा कर प्रणाली:

भारतातील अप्रत्यक्ष करांमध्ये 'वस्तु व सेवा कर'(GST) अमलात येण्यापूर्वी केंद्र सरकारचे कर व राज्य सरकारचे कर खालील प्रमाणे आहेत.

### अ. केंद्र सरकारचे कर :—

१. केंद्रीय उत्पादन शूल्क
२. अतिरिक्त उत्पादन शुल्क (विशेष महत्वाच्या वस्तू)
३. उत्पादन शुल्क (औषधी आणि प्रसाधन सामुग्री)
४. अतिरिक्त उत्पादन शुल्क (कापड व कापड उत्पादने)
५. अतिरिक्त सीमा शुल्क (CVD) Countervailing duty (आयात कर)
६. विशेष अतिरिक्त सीमा शुल्क (SAD)
७. सेवा कर
८. वस्तु व सेवांच्या पुरवठयाशी संबधित असलेला केंद्रीय अधिभार आणि उपकर.

### ब. राज्य सरकारचे कर :—

१. राज्य मूल्यवर्धीत कर
२. केंद्रीय विक्रीकर
३. ऐषआराम कर



LBP PUBLICATION

४. प्रवेश कर (ऑक्ट्रॉय, एलबीटी, वाहनावरील प्रवेश कर, वस्तू वरील प्रवेश कर इत्यादी.)
५. करमणूक आणि मनोरंजन कर(स्थानीक संस्थांनी आकारलेल्या करा व्यतिरिक्त
६. जाहिरातीवरील कर
७. खरेदी कर
८. वनविकास कर (वन उपजांचा विक्रिवरील कर)
९. लॉटरी, बेंटीग आणि जुगारावरील कर
१०.वस्तू व सेवांच्या पुरवठयाशी संबधित असलेला अधिभार आणि उपकर.

**वस्तु व सेवा कर (GST) मध्ये समाविष्ठ होणारे कर खालील प्रमाणे आहेत.**

## अ. केंद्रीय वस्तू व सेवा कर (CGST) :–

१. उत्पादन शुल्क
२. अतिरिक्त उत्पादन शुल्क
३. सेवा कर
४. अधिभार व उपकर

केंद्रीय वस्तु व सेवा कर (CGST) हा राज्याअंतर्गत पुरवठयावर लागू होईल व सकंलन झालेला कर केंद्र सरकार घेईल.

## ब. राज्य वस्तु व सेवा कर (SGST) कर :–

१. करमणुक व मनोरंजन कर
२. खरेदी कर
३. जकात, एलबीटी व इतर प्रवेष कर
४. जाहिरात कर
५. लॉटरी, बेटीग व गॅम्बलींग कर
६. अधिभार व उपकर
७. व्हॅट (VAT)
८. ऐषआराम कर

'राज्य वस्तु व सेवा कर' (GST) हा राज्याअंतर्गत पुरवठयावर लागू होईल. व संकलन झालेला कर राज्य सरकार घेईल.

## क. एकात्मिक वस्तु व सेवा कर (IGST) –

१. केंद्रीय विक्रीकर
2. सी.व्ही.डी. ( CVD) Countervailing Duty
3. एस.ए.डी. (SAD ) Special Additional Duty

'एकात्मिक वस्तु व सेवा कर' (IGST) हा आंतरराज्य व्यवहार व आयातीवर कर आकारला जातो व संकलन झालेला कर केंद्र व राज्यामध्ये वाटला जातो.

LBP PUBLICATION

**'वस्तु व सेवा कर'(GST) अमलात येण्यापूर्वी विविध ठिकाणी व्यवसायाच्या नोंदणीची आवश्यकता होती.**




**'वस्तु व सेवा कर' (GST) प्रणालीमध्ये व्यवसायाची नोंदणी**




'वस्तु व सेवा कर' (GST) प्रणालीमध्ये फक्त दोन ठिकाणी नोंदणी करावी लागत असल्यामूळे व्यावसायिकाच्या दृष्टीने ही प्रणाली सोपी व सरळ आहे.

## 'वस्तु व सेवा कर' (GST) प्रणालीचे करदर संरचना

'वस्तु व सेवा कर' (GST) प्रणालीमध्ये केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने निश्चित करण्यात आलेल्या दराने (CGST & SGST) कराची आकारणी करण्यात येते. 'वस्तु व सेवा कर' (GST) परिषदेच्या शिफारशीनुसार पाच कर दर घोषीत केलेले आहेत. 'वस्तु व सेवा कर' (GST) लागु झाल्यामुळे राज्यांना राजस्वाची हानी झाल्यास या हानीची भरपाई करण्यासाठी पाच वर्षापर्यंत चैनीच्या वस्तुवर २८ टक्के च्या कमाल दराने उपकर लावले जाणार आहेत. वस्तु व सेवा कर (GST) प्रणालीचे करदर खालिल प्रमाणे आहेत.

LBP PUBLICATION

## 'वस्तु व सेवा कर' (GST) प्रणालीचे करदर संरचना

| अ.क्र | वस्तु व सेवांचा प्रकार | करदर |
|---|---|---|
| १ | थ्जवनावश्यक वस्तू (अन्नधान्यासह) – दुध, लोणी, फळ, भाज्या, मासे, बांगळया इत्यादी | 00 (शुन्य) |
| २ | सर्वसाधारणपणे वापरात असणाऱ्या वस्तु व सेवा – पनिर, कॉफी, चाय, मसाले, साबुदाना, केरोसीन, कोळसा इत्यादी. | 5% |
| ३ | ग्राहकोपयोगी वस्तु व सेवा – मासांच्या निर्मित वस्तु, तुप, पॅकिंगमध्ये असणारे वाळलेले फळ, दंतमंजन, कशन, कव्हर, शिलाई मशीन, सेलफोन इत्यादी. | 12% |
| ४ | ग्राहकपयोगी वस्तु व सेवा (मोठया प्रमाणात वस्तुचा समावश होतो.) ज्यात स्वाद युक्त साखर, पास्ता, पेस्ट्री, केक, आईस्क्रीम, स्टील, कॅमेरा, मॉनिटर, सिंथेटिक यार्न इत्यादी. | 18% |
| ५ | लक्झरी मोटार, तंबाखु उत्पादने, शितपेये व इतर लक्झरीयस वस्तु, पेन्ट, सेविंग क्रीम, टाईल्स, वॉटर हिटर, वॉशिंग मशिन | 28% |

### 'वस्तु व सेवा कर' पुर्वीचे कर दर व 'वस्तु व सेवा कर'चे कर दर संरचना

'वस्तु व सेवा कर' परिषदेने अधिकाऱ्याच्या समिती मार्फतीन 'वस्तु व सेवा कर' (GST) पुर्वीच्या कर रचनेचा विचार करून कोणकोणत्या वस्तु व सेवा कोणत्या कररचनेत येतात ते निश्चित केले आहे. जवळपास १२११ वस्तु असून या वस्तुची १० प्रकारात वर्गीकरण केलेले आहे. या प्रत्येक प्रकारात विविध वस्तु समाविष्ठ केलेल्या असून यावर कर आकारलेले आहे. यामध्ये सर्व वस्तुचे नाव देणे शक्य नसल्यामुळे १० प्रकारच्या वर्गीकरणानुसार कर दर कसे आहेत हे दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

### 'वस्तु व सेवा कर'(GST) पुर्वीचे कर दर व 'वस्तु व सेवा करा'(GST) चे कर दर तालीका

| अ.क्र. | वस्तुच्या वर्गीकरणाचा प्रकार | वस्तु व सेवा कर (GST) पुर्वी करदर | वस्तु व सेवा कर (GST) करदर |
|---|---|---|---|
| 1 | ग्राहक वस्तु ( Consumer Goods) :-<br>उदा.<br>Shaving Cream<br>Dry fruits<br>Abarbatti | 6% ,12%,18.5%<br>19.5%, 20%, 26%<br>26%<br>6%<br>-<br>काही वस्तुवर कर नाही | 5% ,12%,18.%<br>28%<br>28%<br>12%<br>5%<br>काही वस्तुवर कर नाही |
| 2 | जीवन षैली आणि घरगुती वस्तु<br>( Life style and home Goods)<br>उदा.<br>Leather Bag<br>Cell phones. | 6%, 18.5%, 26%<br><br>6%<br>6% | 5%, 12%, 18%,28%<br><br>28%<br>18% |
| 3 | सौंदर्य प्रसाधने ( Buity Personal Care)<br>(सर्व वस्तुवर दिल्याप्रमाणे कर) | 26%<br>काही वस्तुवर कर नाही | 28%<br>काही वस्तुवर कर नाही |
| 4 | स्वयंपाक उपयोगी उपकरने<br>( Kitchenware and Appliances )<br>उदा.<br>Electrical hot plates<br>Copper utensils. | 17%, 18.5%<br><br>18.5%<br>18.5% | 5%, 12%, 28%<br><br>28%<br>5% |

LBP PUBLICATION

| | | | |
|---|---|---|---|
| 5 | बांधकाम उपयोगी वस्तु ( Contraction )<br>उदा.<br>Wallpaper<br>Putty, Wall Filling. | 6%, 18.5%,26%,30%<br><br>18.5%<br>26% | 5%,12%,28%<br><br>28%<br>28% |
| 6 | दुग्धजन्य व शेतीतील वस्तु ( Dairy and farm production) सारखे कर. | 12%<br>काही वस्तुवर कर नाही | 12%<br>काही वस्तुवर कर नाही |
| 7 | वैद्यकीय पूरवठा ( Medical Supplies)<br>सारखे कर उदा. Human blood. | 12%<br>00<br>काही वस्तुवर कर नाही | 12%<br>00<br>काही वस्तुवर कर नाही |
| 8 | धातु आणि खनिजे ( Metals and Mineral)<br>उदा.<br>Coal<br>Petroleum coke, Petroleum bitumen. | 17%, 18.5%,19.5%<br>27.5%<br>12%<br>27.5% | 5%,18%<br><br>5%<br>18% |
| 9 | सेवा ( Service )<br>उदा.<br>Telecom<br>Five star restaurant. | 13-14%,15%,18%<br><br>15%<br>18% | 12%,18%,28%<br><br>18%<br>28% |
| 10 | इतर ( Other)<br>उदा.<br>Rubber Tires<br>Children drawing Books. | 6%, 12%, 12.5%<br>13.5%, 18.5%, 26%<br>18.5%<br>00<br>काही वस्तुवर कर नाही | 5%,12%,18%<br>28%<br>28%<br>12%<br>काही वस्तुवर कर नाही |

वरील 'वस्तु व सेवा करा' (GST) पुर्वीचे करदर व 'वस्तु व सेवा कराचे' करदर याचा बारकाईने अभ्यास केला तर वस्तु व सेवा करपूर्वीच्या करदरापेक्षा वस्तु व सेवा करा (GST) चे करदर अधिक आहेत. त्यामूळे वस्तु व सेवा कर (GST) अमंलबजावणीमुळे भारतीय आर्थिक स्थितीवर अनुकुल परिणाम झाला आहे.

मात्र, सामान्य माणसाच्या म्हणजेच उपभोक्त्यांच्या आर्थिक स्थितीवर प्रतिकुल परिणाम झाल्याचे दिसून येते.

## वस्तु व सेवा कर' (GST) संकलन
## (आर्थिक वर्ष एप्रिल २०१८ते मार्च २०१९)
### 'वस्तु व सेवा कर' (GST) संकलन तालिका (आकडे कोटीमध्ये आहेत)

| अ.क्र | महिने | कर संकलन (रूपये) | अ.क्र | महिने | कर संकलन (रूपये) |
|---|---|---|---|---|---|
| १ | एप्रिल | १०३४५९ (कोटी) | ७ | आक्टोंबर | १००७१० (कोटी) |
| २ | मे | ९४०१६ (कोटी) | ८ | नोव्हेंबर | ९७६३७ (कोटी) |
| ३ | जुन | ९५६१० (कोटी) | ९ | डीसेंबर | ९४७२६ (कोटी) |
| ४ | जुलै | ९६४८३ (कोटी) | १० | जानेवारी | १०२५०३ (कोटी) |
| ५ | ऑगस्ट | ९३९६० (कोटी) | ११ | फेब्रुवारी | ९७२४७ (कोटी) |
| ६ | सप्टेंबर | ९४४४२ (कोटी) | १२ | मार्च | १०६५७७ (कोटी) |
| एकुण | | ५७७९७० (कोटी) | एकुण | | ५९९४०० (कोटी) |

'वस्तु व सेवा कर' (GST) १ जुलै २०१७ पासून अमलात आला असून केंद्र व राज्याचे विविध कर यामध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत. २०१८—२०१९ या आर्थिक वर्षाच्या एप्रिल २०१८ मध्ये

१०३४५९ कोटी रूपये 'वस्तु व सेवा करापोटी (GST) संकलन झाले होते. तर मार्च २०१९ मध्ये १०६५७७ कोटी रूपये कराचे संकलन झाले होते.

२०१८—२०१९ या आर्थिक वर्षाच्या एप्रिल २०१८ ते सप्टेंबर २०१८ या पहिल्या सहा महिण्यात ५७७९७० कोटी रूपये 'वस्तु व सेवा कराचे संकलन झाले होते. तर आक्टोंबर २०१८ ते मार्च २०१९ या दुसऱ्या सहा महिण्यात ५९९४०० कोटी रूपये कराचे संकलन झाले होते. २०१८—२०१९ या आर्थिक वर्षात पहिल्या सहा महिण्याच्या तुलनेत दुस—या सहा महिण्यामध्ये (५९९४००—५७७९७०) २१४३० कोटी रूपये 'वस्तु व सेवा कर' (GST) संकलनात वाढ झालेली दिसून येते.

## 'वस्तु व सेवा कर' (GST) चे फायदे :—

### अ. व्यापारी फायदे —

१. सोपी व सुटसुटीत करप्रणाली असल्यामुळे व्यावसायिक नोंदणी करणे व कर आकारणी सोपे होईल.
२. पारदर्शक कर प्रणाली असल्यामुळे सरकार खाते कर भरण्यास सोपे जाईल.
३. अनेक करा ऐवजी एक कर पध्दती आहे.
४. वस्तु आहे की सेवा हा वाद संपुष्टात येईल.
५. करावर कर लावण्यापासून मुक्तता मिळेल.

### ब. अर्थव्यवस्थेचे फायदे. :—

१. एक देश एक कर पध्दती.
२. कराची चोरी किंवा कर न भरणे कमी होईल.
३. महसुली उत्पन्नात वाढ होईल.
४. रोजगार वृध्दीत वाढ होईल.
५. देशाच्या जीडीपी मध्ये वाढ होईल व त्यामुळे देशाचा विकास होईल.

### क. ग्राहकांचे फायदे :—

१. काही वस्तु व सेवा करामधून सुट मिळत असल्यामूळे ग्राहकांना आर्थिक समाधान मिळेल.
२. देशभर समान करपध्दती.
३. सरकारच्या महसुली उत्पन्नात वाढ झाल्यामुळे इतर सेवांची अपेक्षा

## समारोप —

भारतातील 'अप्रत्यक्ष कर' व्यवस्थेतील 'वस्तु व सेवा कर' (GST) प्रणाली आमलात आणुन एक महत्वपूर्ण सूधारणा भारत सरकारने केलेली आहे. या प्रणालीमुळे केंद्र सरकार व राज्य सरकार यांना नियमानुसार ठरलेल्या प्रतिशताप्रमाणे कर संकलनात त्यांचा वाटा त्यांना मिळतो. त्यामुळे केंद्र सरकारला व राज्य सरकारला कराच्या माध्यमातुन महसुली उत्पन्न मिळते. (CGST, SGST, IGST प्रमाणे) त्यामुळे केंद्र सरकारला व राज्य सकारला कराच्या माध्यमातुन उत्पन्न, मागील वर्षाच्या तुलनेत कर संकलनात वाढ झाली आहे.

'वस्तु व सेवा कर' (GST) कर दराचा बारकाईने अभ्यास केल्यास भारतीय अर्थव्यवस्थेवर अणुकुल परिणाम झाल्याचे दिसुन येते. मात्र, सामान्य माणसाच्या म्हणजेच उपभोक्त्यांच्या आर्थिक स्थितीवर प्रतिकुल परिणाम झाल्याचे दिसून आले आहे.

'वस्तु व सेवा करा' (GST) पूर्वी व्यवसायिकांना व्यवसायाची विविध ठिकाणी नोंदणी करावी लागत होती. परंतू 'वस्तु व सेवा कर' प्रणालीमुळे व्यवसायिकांना राज्य कर अधिकारी व केंद्र कर अधिकारी या दोनच ठिकाणी नोंदणी करावी लागत असल्यामुळे ही प्रणाली सोपी व सरळ आहे. त्यामुळे ही कर प्रणाली प्रशासकीय अमलबजावणीत पारदर्शकता निर्माण होईल.



LBP PUBLICATION

## संदर्भग्रंथ सूची :—


1. India.gst.in
2. Indiagstdotin.wordpress.com
3. www.Bloomberquint.com
4. Wikipedia, webside
5. विविध संशोधन निबंधाचा अभ्यास.
6. प्रा. कामथे, प्रविण., प्रा. पाटील, मेघना., वस्तु आणि सेवा कर कायदा एक परिचय, साई ज्योती प्रकाशन , नागपूर.





**डॉ. रेकचंद ग. गोंगले**
सहाय्यक प्राध्यापक , एम.कॉम,एम.फील,पीएच.डी , स्नातकोत्तर वाणिज्य विभाग , नबीरा महाविद्यालय, काटोल.


LBP PUBLICATION